# जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, नांदेड

'विधी सेवा सदन', जिल्हा न्यायालय, रेल्वे स्टेशन रोड, नांदेड–४३१६०१

E-Mail : legalaidnanded@gmail.com Mob.No. 8591903626

न्या.र.का.नांदेड–जाहिरात क्र.०१–२०२५/ 579 /२०२५, दिनांक ०२/०५/२०२५

## कंत्राटी पद भरतीची जाहिरात

मा. महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांचे पत्र जा.क्र.२०२४/२५६७ दिनांक ०८/०८/२०२४ नुसारच्या निर्देशाप्रमाणे व मा. अध्यक्ष, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, नांदेड यांच्या आदेशान्वये न्याय रक्षक कार्यालय, नांदेड येथे खालील कंत्राटी पद भरतीसाठी इच्छुक उमेदवारांकडून अर्ज माविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | कंत्राटी पदाचे नांव | पदसंख्या | पदाकरीताचे मासिक मानधन | पदासाठी शैक्षणिक पात्रता |
|---|---|---|---|---|
| ०१ | शिपाई | ०१ | १५००० | इयत्ता ७ वी परीक्षा उत्तीर्ण |

उपरोक्त नमुद कंत्राटी पदाकरीता विहित नमुन्यातील अर्ज जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, नांदेड, 'विधी सेवा सदन', जिल्हा न्यायालय, रेल्वेस्टेशन रोड नांदेड–४३१६०२ या कार्यालयात प्रत्यक्षरित्या अथवा पोस्टाद्वारे दिनांक ०९/०५/२०२५ रोजी सायंकाळी ०५:०० वाजता पर्यंत पोहंचतील अशा बेताने सादर करावे. दिनांक ०९/०५/२०२५ रोजी सायंकाळी ०५:०० वाजतानंतर प्राप्त होणारे अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

सदर भरती संदर्भातील सर्व अद्यावत माहिती मा. जिल्हा न्यायालय, नांदेड च्या अधिकृत संकेतस्थळ **https://districts.ecourts.gov.in/nanded** यावर उपलब्ध राहील आणि उमेदवारांनी वेळोवेळी देण्यात येणा–या सुचनांची सदर संकेतस्थळावरुन स्वत: नोंद घ्यावी. दिनांक ०२/०५/२०२५ रोजी पासून जाहिरात अर्जाच्या नमुन्यासह सदर संकेतस्थळावरुन डाउनलोड करता येईल.

वयोमर्यादा :–

अ) उमेदवार, जाहिरातीच्या तारखेस १८ वर्षपिक्षा कमी वयाचा आणि ३८ वर्षपिक्षा जास्त वयाचा नसावा आणि अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती, इतर मागासवर्ग किंवा माहराष्ट्र शासनाद्वारे २८/०३/२०१८ रोजी त्यावेळेपुरत्या विनिर्दिष्ट केलेल्या मागासप्रवर्गाकरिता ४३ वर्षपेक्षा जास्त वयाचा नसावा. तसेच न्यायालय/ जिल्हा विधी सेवा प्राधिकरण येथील सेवा निवृत्त कर्मचारी / अनुभवी कंत्राटी कर्मचारी, यांच्या अनुभवाचा लाभ मिळावा यासाठी कमाल वयोमर्यादेची अट त्यांना लागू नसेल.

ब) शासन निर्णय क्र. एस.आर.व्ही.–१०७७/३५७६/१४३३/१६–अ, दिनांक २३/०५/१९७८ नुसार शारिरिकदृष्ट्या अपंग व्यक्ती, जर त्या अन्यथा योग्य व सदर पदांची कर्तव्ये पार पाडण्याकरीता सक्षम असतील तर, त्यांच्या बाबतीत सेवा प्रवेशासाठी विहित केलेली उच्च वयोमर्यादा ४५ वर्षापर्यंत शिथिल केलेली आहे.

कराराची वैधता :— नियुक्तीचा करार कलावधी एक वर्षाकरीता वैध असेल.

करार संपुष्टात आणणे :— उमेदवाराच्या सेवा त्याच्या / तिच्या कामगिरीचे मुल्यमापन केल्यानंतर असमाधनकारक आढळून आल्यास कोणतीही सूचना आणि स्पष्टीकरण न देता कोणत्याही वेळी संपुष्टात आणल्या आउ शकतात.

अधिकार :— सर्व अधिकार अध्यक्ष, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, नांदेड यांच्याकडे राखीव आहेत.

उमेदवारांना सुचना :—

१. अर्जाचा नमुना व सोबतच्या प्रमाणपत्रांचे नमुने जिल्हा न्यायालय, नांदेडचे संकेतस्थळ **https://districts.ecourts.gov.in/nanded** यावर उपलब्ध आहेत. त्या नमुन्यातच अर्ज व सोबतची प्रमाणपत्रे तसेच शैक्षणिक प्रमाणपत्रांच्या प्रती बंद लिफाफ्यामध्ये जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, नांदेड या कार्यालयात सादर करावेत.

२. उमेदवाराने त्याचे / तिचे अलीकडचे पासपोर्ट आकाराचे रंगीत फोटो अर्जावर दिलेल्या जागी लावून त्यावर अशाप्रकारे स्वाक्षरी करावी की त्यातील काही भाग छायाचित्रावर आणि अर्जावर सुध्दा राहील.

३. उमेदवाराने एक सन्माननीय व्यक्तीचा जाहिरातीच्या तारखेनंतर दिलेला चारित्र्याचा दाखला सादर करावा. तसेच त्यांचे विरुध्द कुठल्याही न्यायालयात कुठलाही फौजदारी खटला निकाली / चाल किंवा प्रस्तावित नसल्याचे प्रमाणीत करावे. असल्यास त्याचा तपशील द्यावा.

४. विहित नमुन्यात नसलेला आणि अपूर्ण माहिती असलेला अर्ज अपात्र ठविण्यात येईल.

५. सदर जाहिरातीत आवश्यक ते बदल करण्याचे अधिकार निवड समितीकडे राखुन ठेवलेले आहेत.

६. निवडप्रक्रिया :—

क्रियाशीलता व स्वच्छता चाचणी १० गुणांची घेतल्या जाईल. या चाचणीमध्ये उमेदवारांच्या हालचालीतील चपळाई व तत्परता, न्यायालय इमारत आणि आवाराच्या स्वच्छतेमधील उमेदवारांचे कौशल्य व चपळाई उमेदवारांकडून प्रत्यक्ष काम करुन घेवून तपासले जाईल. क्रियाशिलता व स्वच्छता परीक्षा यातील उमेदवाराचे काम यावर आधारीत पात्र उमेदवारांची मुलाखतीसाठी यादी मुलाखतीच्या वेळापत्रकासह जिल्हा न्यायालयाच्या सुचना फलकावर त्याच दिवशी लावली जाईल. अशा उमेदवारांची संख्या जाहिरात दिलेल्या पदसंख्येच्या तिपटीपेक्षा जास्त नसेल. जर १:३ हे प्रमाण राखण्यासाठी शॉर्टलिस्ट केलेल्या उमेदवारांपैकी शेवटच्या उमेदवाराइतके गुण मिळवणारे एकापेक्षा अधिक उमेदवार असतील तर अशा सर्व उमेदवारांना मौखिक परीक्षेसाठी बोलावले जाईल.

७. वयाच्या पडताळणीसाठी जन्म प्रमाणपत्र अथवा शाळा सोडल्याचा दाखला किंवा शालांत परिक्षेचा दाखला आवश्यक राहील.

८. उपरोक्त पदासाठी दिलेली ठोक रक्कम दरमहा मानधन मिळेल या व्यतिरिक्त कोणत्याही प्रकारचे आर्थिक लाभ मिळणार नाहीत. तसेच कोणत्याही प्रकारची रजा मिळण्याचा हक्क असणार नाही. सदरील नेमणुक पुर्णत: कंत्राटी पध्दतीची राहील.

९. मुलाखत :—

चाचणी परीक्षेनंतर मुलाखतीस पात्र उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलावले जाईल त्यावेळेस खालील प्रमाणपत्राच्या साक्षांकित प्रती आणि त्यांचे मुळ प्रमाणपत्र सादर करावे.

१. जन्म तारखेचा दाखला किंवा पुरावा (शाळा सोडल्याचे/एस.एस.सी. दाखला)
२. अर्हता परीक्षा उत्तीर्ण झाल्याबाबतचा दाखला.
३. अर्जात नमुद केलेल्या प्रतिष्ठित व्यक्तीने दिलेले चारित्र्य प्रमाणपत्राचा दाखला.
४. अर्हतेच्या रकान्यात नमुद केल्याप्रमाणे शैक्षणिक कागदपत्रे.
५. संबंधीत जिल्हा सरकारी रुग्णालयातील जिल्हा शल्यचिकित्सक / वैद्यकीय अधिक्षक यांनी दिलेला अपंगत्वाचा दाखला, लागु असल्यास.
६. शासन विहित करेल त्या प्राधिका—याने दिलेला जातीचा दाखला जेथे लागु असेल तेथे.
७. लहान कुटुंबा बाबतचे प्रतिज्ञापत्र नमुना—अ जे जाहिरातीच्या शेवटी उपलब्ध आहे.

१०. उमेदवारांना चाचणी परीक्षेसाठी निश्चित केलेल्या तारखांना स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.

११. भरती प्रक्रियेच्या वेळापत्रकात या कार्यालयाचे नियंत्रण नसलेल्या कोणत्याही अकल्पित घटकांच्या घडण्यासापेक्ष बदल होवु शकतो. असा बदल वेळोवेळी कार्यालयाच्या सुचना फलकावर अधिसुचित करण्यात येईल आणि जिल्हा न्यायालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

दिनांक :— ०२/०५/२०२५

सचिव
जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, नांदेड.

# जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, नांदेड

## कंत्राटी शिपाई पदासाठी अर्ज

उमेदवाराचा स्वसाक्षांकित फोटो

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १. | अर्जदाराचे नांव | : | (प्रथम नांव) | (पित्याचे / पतीचे नांव) | (आडनांव) |
| २. | संपुर्ण पत्ता पिनकोड क्रमांक सहीत | : | मोबाईल नं. : | | |
| ३. | ईमेल आयडी | : | | | |
| ४. | लिंग (स्त्री / पुरुष / इतर) | : | | | |
| ५. | जात व प्रवर्ग | : | | | |
| ६. | जन्म दिनांक | : | / / | | |
| ७. | जाहिरातीच्या दिवशी उमेदवाराचे वय | : | ____ वर्षे ____ महिने ____ दिवस | | |
| ८. | (विवाहित / अविवाहित) | : | | | |
| ९. | शैक्षणिक अर्हता | : | (सोबत शैक्षणिक अर्हतेची स्वक्षांकित कागदपत्रे जोडावीत) | | |

| अ.क्र. | शैक्षणिक अर्हता | परिक्षा मंडळ / विद्यापीठ | उत्तीर्ण झाल्याचे वर्ष | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

९. इतर कामामध्ये विशेष रुची : ...............................................................

१०. अनुभव असल्यास : ...............................................................
...............................................................
...............................................................

११. उमेदवाराचे चारित्र्य / वर्तणुक प्रमाणपत्र देणा—या प्रतिष्ठित व्यक्तीचे नांव व पत्ता : ...............................................................
...............................................................
...............................................................
...............................................................

मी याद्वारे शपथपुर्वक कथन करतो / करते की, मला फौजदारी गुन्ह्यात अटक वा शिक्षा झालेली नाही आणि माझ्या विरुध्द कोणत्याही फौजदारी न्यायालयात खटला प्रलंबित अथवा प्रस्तावित नाही व माझे विरुध्द गुन्हा दाखल झालेला नाही.

मी याद्वारे शपथपुर्वक कथन करतो / करते की, अर्जात नमुद केलेली माहिती माझ्या माहितीनुसार सत्य आणि बरोबर आहे. त्यातील कोणतीही गोष्ट खोटी / चुकीची आढळल्यास मला निवड प्रक्रियेपासून अपात्र घोषित केले जाईल आणि जन निवड / नेमणुक झाल्यास माझी सेवा कोणतीही नोटीस सूचना दिल्याविना समाप्त केली जाईल, हे मला मान्य आहे.

दिनांक :

अर्जदाराचे पुर्ण नांव व सही.

# नमुना "अ"

मी श्री / श्रीमती / कुमारी ____________________________________

श्री ____________________________________ यांचा / यांची मुलगा / मुलगी

वय ____________ वर्ष राहणार ____________________________________

________________________ याद्वारे पुढीलप्रमाणे जाहीर करतो / करते की,

1. मी ______________________________ या पदासाठी माझा अर्ज सादर केला आहे.
2. आज रोजी मला ________ (संख्या) इतकी मुले आहेत. यापैकी दिनांक 28 मार्च, 2008 नंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या ________ आहे. (असल्यास जन्मदिनांक नमुद करावा)
3. हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल तर दिनांक 28 मार्च, 2006 नंतर जन्माला आलेल्या मुलांमुळे या पदासाठी मी अपात्र होईन याची मला जाणीव आहे.

स्थळ :-

दिनांक :- / /2025 उमेदवाराची स्वाक्षरी

# <u>प्रतिज्ञापत्र</u>

मी आवेदक / अर्जदार ____________________________________________ याद्वारे प्रतिज्ञापुर्वक जाहीर करतो / करते की / सांगतो / सांगते की, मला कधीही अटक झालेली नाही तसेच माझेविरूध्द कोणतेही फौजदारी प्रकरण प्रलंबित नाही किंवा / तसेच मला कोणत्याही फौजदारी न्यायालयाने दोषी ठरवून शिक्षा ठोठावलेली नाही किंवा माझे विरूध्द कुठलाही गुन्हा दाखल नाही.

स्थळ :–

दिनांक :– / /2025 आवेदकाचे नाव व सही

नमुना "ब"

**चारित्र्य (वर्तणुक) प्रमाणपत्र**

प्रमाणित करण्यात येते की, श्री/श्रीमती/कुमारी ______________________________ हे/हया __________________________ तालुका __________ जिल्हा __________ येथील रहिवासी असून, मी त्यांना मागील __________ वर्षापासुन ओळखतो, त्यांची वर्तणुक व चारित्र्य चांगले आहे, ते / त्या माझे / माझ्या नातेवाईक नाहीत.

करिता सदरहू वर्तणुक / चारित्र्य प्रमाणपत्र देण्यात येत आहे / दिले आहे.

स्थळ :–

दिनांक :– / /2025

प्रमाणपत्र देणाऱ्याचे नाव, सही व शिक्का

पत्ता ___________________________

___________________________

___________________________

भ्रमणध्वनी क्रमांक ________________